सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२२/M/०००४३१**

**अपिलार्थी श्री. तुळशीदास मुरारी कवाळे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी (जल-२)**
मृद व जलसंधारण विभाग, ७ वा मजला, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव**
मृद व जलसंधारण विभाग, ७ वा मजला, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ११.०७.२०२४</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०४.०७.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.)
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ३१.१०.२०२१ | २४.११.२०२१/१३.१२.२०२१ | ०७.१२.२०२१ | २५.०१.२०२२ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २२.०१.२०२२ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २४.११.२०२१ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. ३१.१०.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार दि. १८.०३.२०२१ रोजी त्यांचे प्रलंबित सेवानिवृत्ती विषयी केलेली विनंती अर्जाविषयी माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि. २४.११.२०२१ रोजी अपिलार्थींनी मागणी केलेली माहिती प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, नाशिक या कार्यालयाकडे उपलब्ध असल्याने माहिती अर्ज प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, नाशिक कडे हस्तांतरीत केला आहे. प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नाशिक यांनी दि. १३.१२.२०२१ रोजीच्या पत्रानुसार अपिलार्थींना कळविले की, त्यांचे सर्व प्रकरणे निकाली काढण्यासाठी जिल्हा जलसंधारण अधिकारी, मंडळ कार्यालय तसेच शासन स्तरावरुन वेळोवेळी कार्यवाही झालेली असून, आपणास वेळोवेळी माहिती देण्यात आली आहे. तरीही आपण कार्यालयात उपस्थित राहावे व आपल्याशी संबंधीत सर्व धारिका आपणास निरिक्षणाकरिता नियमानुसार उपलब्ध करुन देण्यात येतील. अपिलार्थींचे

..२/-

सदर उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. ०७.१२.२०२१ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०१.२०२२ रोजी जन माहिती अधिकारी यांना सदर विषयी कार्यासनात प्राप्त झालेल्या अर्जांवर केलेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असे आदेशीत करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि. ३१.०१.२०२२ च्या पत्रानुसार अपिलार्थींना माहिती पाठविली आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी त्यांचे निवेदन दि. ११.०७.२०२४ आयोगासमोर सादर केले. ते अभिलेखावर घेण्यात आले. जन माहिती अधिकारी यांनी निवेदन सादर करुन नमुद केले की, त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार अपिलार्थींना उपलब्ध माहिती दि. ३१.०१.२०२२ रोजी पाठविलेली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

12-7-2024

**मुंबई** **(डॉ. प्रदीप व्यास)**
**दिनांक : १२.०७.२०२४** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

State Information Commission
Greater Mumbai

राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ